# मिरा भाईंदर महानगरपालिका

## (गोषवारा)

सभा दि. ०४/११/२०२२

e4

विषय :- महापालिकेच्या DCH/DCHC/CCC/रुग्णालय येथे तसेच मुख्य कार्यालय, अतिक्रमण कारवाईकरीता प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 व मनपाच्या इतर मालमत्तांच्या संरक्षणार्थ पुरुष व महिला सुरक्षारक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करणेबाबत येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महापालिकेच्या DCH/DCHC/CCC/रुग्णालय तसेच महानगरपालिकेस आवश्यक त्या विभागांकरीता व पाठवेल त्या ठिकाणी पुरुष व महिला सुरक्षारक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करणेबाबत जा.क्र.मिभा/मनपा/आस्था/616/2021-22, दि.14/06/2021 रोजीचे कार्यादेशान्वये दि.15/06/2021 ते दि.14/06/2022 रोजीपर्यंत 01 वर्षाकरीता करारनामा करण्यात आलेला आहे.

सदरचा करारनामा दि.14/06/2022 रोजी संपुष्टात आलेनंतर सध्याचा 250 सुरक्षारक्षक पुरवठा दि.15/06/2022 ते दि.14/09/2022 पर्यंत पुढे चालू ठेवण्यासाठी 03 महिन्यांची मुदतवाढ महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन या संस्थेस देणेबाबतचा प्रस्ताव जा.क्र.मनपा/आस्था/551/2022-23, दि.07/06/2022 अन्वये मा.महासभेपुढे ठेवणेत आलेला होता.

दि.03/08/2022 रोजीच्या मा. महासभेमध्ये सदर प्रस्तावावर चर्चा होऊन ठराव क्र.32 अन्वये महापालिकेस महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून सुरक्षा रक्षक घेणे बंधनकारक नाही. तसेच प्रशासनाला सुरक्षा रक्षकांची गरज भासल्यास केवळ 25 सुरक्षा रक्षक घेण्यास मंजूरी दिलेली आहे.

**सदरचा ठराव नगरसचिव विभागाकडून आस्थापना विभागास दि.15/09/2022 रोजी प्राप्त झालेला आहे.**

मा. महासभा दि.03/08/2022 ठराव क्र.32 मंजूर करताना मा.महासभेने सदर प्रकरणी प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यात वस्तुस्थिती सादर केलेली असुनदेखील प्रशासनाने सादर केलेला गोषवारा विचारात घेतलेला नाही. तसेच कोणत्याही कायदेशीर बाबींचा व तर्काचा विचार केलेला दिसत नसून कोणत्या निकषाच्या आधारे सदरचा ठराव मंजूर केला याबाबतची देखील कारणमिमांसा केलेली दिसून येत नाही. त्यामुळे मा.महासभा दि.03/08/2022 ठराव क्र.32 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 451 मधील तरतुदीनुसार विखंडीत करणेकरीता जा.क्र.मिभा/मनपा/आस्था/1326/2022-23, दि.20/09/2022 अन्वये शासनास प्रस्ताव पाठविणेत आलेला आहे.

महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचा मिरा भाईंदर महानगरपालिकेसमदेत केलेला करारनामा जरी दि.14/06/2022 रोजी संपुष्टात आलेला असला, तरी त्यांचेकडील सुरक्षारक्षक महानगरपालिकेच्या विविध विभागात कार्यरत असून महापालिकेच्या मालमत्तांचे

सुरक्षेचे कर्तव्य उत्तमरित्या पार पाडीत आहेत. सबब महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सद्यस्थितीत कार्यरत एकूण 250 सुरक्षारक्षकांना दि.15/06/2022 ते दि.14/09/2022 रोजी पर्यंत कालावधीचे एकुण वेतन रु.1,77,39,000/- (अक्षरी रु.एक कोटी सत्याहत्तर लाख एकोणचाळीस हजार मात्र) अदा करणेकरीता जा.क्र.मनपा/आस्था/1435/2022-23, दि.04/10/2022 अन्वये महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांना मंजुरी आदेश दिलेला आहे.

महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षक महानगरपालिकेच्या विविध विभागात कार्यरत असून महापालिकेच्या मालमत्तांचे सुरक्षेचे कर्तव्य उत्तमरित्या पार पाडीत आहेत. सबब सुरक्षारक्षकांची महापालिकेस आवश्यकता विचारात घेता एकुण 250 सुरक्षारक्षक पुरवठयासाठी नव्याने दि.15/09/2022 पासून ते दि.14/09/2023 पर्यंत एकुण 01 वर्षाकरीता करारनामा करणेकरीता तसेच सदर कामी अपेक्षित रक्कम रु.7,09,56,000/- (रु.सात कोटी नऊ लाख छप्पन्न हजार मात्र) इतक्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि 31/10/22 वेळ 12:55 वा.
प्रशासकीय पत्र
रजिस्टर अ.क्र. 100 वर्ष 2022/23
दि.31/10/2022
लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

deepa1\D\Deepa Tambe\Theka Bharati\...doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सर्वसाधारण सभा

## प्रशासकीय ठराव दि. ०४/११ /2022 रोजी दुपारी 3.00 वाजता

९५

विषय :- महापालिकेच्या DCH/DCHC/CCC/रुग्णालय येथे तसेच मुख्य कार्यालय, अतिक्रमण कारवाईकरीता प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 व मनपाच्या इतर मालमत्तांच्या संरक्षणार्थ पुरुष व महिला सुरक्षारक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करणेबाबत येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत...

## कार्यालयीन प्रस्ताव

महापालिकेच्या DCH/DCHC/CCC/रुग्णालय तसेच महानगरपालिकेस आवश्यक त्या विभागांकरीता व पाठवेल त्या ठिकाणी पुरुष व महिला सुरक्षारक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करणेबाबत जा.क्र.मिभा/मनपा/आस्था/616/2021-22, दि.14/06/2021 रोजीचे कार्यादेशान्वये दि.15/06/2021 ते दि.14/06/2022 रोजीपर्यंत 01 वर्षाकरीता करारनामा करण्यात आलेला आहे.

सदरचा करारनामा दि.14/06/2022 रोजी संपुष्टात आलेनंतर सध्याचा 250 सुरक्षारक्षक पुरवठा दि.15/06/2022 ते दि.14/09/2022 पर्यंत पुढे चालू ठेवण्यासाठी 03 महिन्यांची मुदतवाढ महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन या संस्थेस देणेबाबतचा प्रस्ताव जा.क्र.मनपा/आस्था/551/2022-23, दि.07/06/2022 अन्वये मा.महासभेपुढे ठेवणेत आलेला होता.

दि.03/08/2022 रोजीच्या मा.महासभेमध्ये सदर प्रस्तावावर चर्चा होऊन ठराव क्र.32 अन्वये महापालिकेस महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून सुरक्षा रक्षक घेणे बंधनकारक नाही, तसेच प्रशासनाला सुरक्षा रक्षकांची गरज भासल्यास केवळ 25 सुरक्षा रक्षक घेण्यास मंजूरी दिलेली आहे.

**सदरचा ठराव नगरसचिव विभागाकडून आस्थापना विभागास दि.15/09/2022 रोजी प्राप्त झालेला आहे.**

मा.महासभा दि.03/08/2022 ठराव क्र.32 मंजूर करताना मा.महासभेने सदर प्रकरणी प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यात वस्तुस्थिती सादर केलेली असुनदेखील प्रशासनाने सादर केलेला गोषवारा विचारात घेतलेला नाही. तसेच कोणत्याही कायदेशीर बाबींचा व तर्काचा विचार केलेला दिसत नसून कोणत्या निकषाच्या आधारे सदरचा ठराव मंजूर केला याबाबतची देखील कारणमिमांसा केलेली दिसून येत नाही. त्यामुळे मा.महासभा दि.03/08/2022 ठराव क्र.32 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 451 मधील तरतुदीनुसार विखंडीत करणेकरीता जा.क्र.मिभा/मनपा/आस्था/1326/2022-23, दि.20/09/2022 अन्वये शासनास प्रस्ताव पाठविणेत आलेला आहे.

महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचा मिरा भाईंदर महानगरपालिकेसमवेत केलेला करारनामा जरी दि.14/06/2022 रोजी संपुष्टात आलेला असला, तरी त्यांचेकडील

सुरक्षारक्षक महानगरपालिकेच्या विविध विभागात कार्यरत असून महापालिकेच्या मालमत्तांचे सुरक्षेचे कर्तव्य उत्तमरित्या पार पाडीत आहेत. सबब महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सद्यस्थितीत कार्यरत एकूण 250 सुरक्षारक्षकांना दि.15/06/2022 ते दि.14/09/2022 रोजी पर्यंत कालावधीचे एकुण वेतन रु.1,77,39,000/- (अक्षरी रु. एक कोटी सत्याहत्तर लाख एकोणचाळीस हजार मात्र) अदा करणेकरीता जा.क्र.मनपा/आस्था/1435/2022-23, दि.04/10/2022 अन्वये महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांना मंजुरी आदेश दिलेला आहे.

महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षक महानगरपालिकेच्या विविध विभागात कार्यरत असून महापालिकेच्या मालमत्तांचे सुरक्षेचे कर्तव्य उत्तमरित्या पार पाडीत आहेत. सबब सुरक्षारक्षकांची महापालिकेस आवश्यकता विचारात घेता एकुण 250 सुरक्षारक्षक पुरवठयासाठी नव्याने दि.15/09/2022 पासून ते दि.14/09/2023 पर्यंत एकुण 01 वर्षाकरीता करारनामा करणेकरीता तसेच सदर कामी अपेक्षित रक्कम रु.7,09,56,000/- (रु.सात कोटी नऊ लाख छप्पन्न हजार मात्र) इतक्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

## सर्वसाधारण सभा प्रशासकीय ठराव क्र. ८४ दिनांक ०४/११/2022

महापालिकेच्या DCH/DCHC/CCC/रुग्णालय येथे तसेच मुख्य कार्यालय, अतिक्रमण कारवाईकरीता प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 व मनपाच्या इतर मालमत्तांच्या संरक्षणार्थ पुरुष व महिला सुरक्षारक्षक महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करणेबाबत येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षक महानगरपालिकेच्या विविध विभागात कार्यरत असून महापालिकेच्या मालमत्तांचे सुरक्षेचे कर्तव्य उत्तमरित्या पार पाडीत आहेत. सबब सुरक्षारक्षकांची महापालिकेस आवश्यकता विचारात घेता एकुण 250 सुरक्षारक्षक पुरवठयासाठी नव्याने दि.15/09/2022 पासून ते दि.14/09/2023 पर्यंत एकुण 01 वर्षाकरीता करारनामा करणेकरीता तसेच सदर कामी अपेक्षित रक्कम रु.7,09,56,000/- (रु.सात कोटी नऊ लाख छप्पन्न हजार मात्र) इतक्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे."

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- आस्थापना विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीकरीता सादर.

आस्थापना विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## (गोषवारा)

सभा दि. ०४/११/२०२२

९६

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी ठोक मानधनावर डेपो मॅनेजर (बस मेंटेनन्स) व कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) (ठोक मानधन) यांची नियुक्तीचे नविकरण करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभागासाठी ठोक मानधनावर श्री.प्रकाश कुलकर्णी, डेपो मॅनेजर (बस मेंटेनन्स) व श्री.प्रमोद सानप, यांचे कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) (ठोक मानधन) यांना दि.30/05/2022 रोजीच्या आदेशान्वये 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.04/05/2022 ते दि.03/11/2022 पर्यंत नियुक्तीचे नविकरण करण्यात आले आहे.

परिवहन विभागाने श्री.प्रकाश कुलकर्णी, डेपो मॅनेजर (बस मेंटेनन्स) व श्री.प्रमोद सानप, कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) (ठोक मानधन) यांची दि.03/11/2022 रोजी मुदत संपुष्टात येत असल्याने दि.04/10/2022 रोजीच्या पत्रान्वये मुदतवाढीबाबत कार्यवाही करणेकरीता कळविले आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने श्री.प्रकाश कुलकर्णी, डेपो मॅनेजर (बस मेंटेनन्स) व श्री.प्रमोद सानप, कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) (ठोक मानधन) यांची नियुक्ती दि.03/11/2022 रोजीपर्यंत संपुष्टात येत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53(3) अन्वये नगरपालिका अधिकारी/कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहित असेल तसेच आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजूरीवाचून कोणतीही तात्पुरती नेमणूक 06 महिन्यांहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही, असे नमुद आहे.

परिवहन विभागाची आवश्यकता पाहता श्री.प्रकाश कुलकर्णी, डेपो मॅनेजर (बस मेंटेनन्स)(ठोक मानधन रु.45,000/-) व श्री.प्रमोद सानप, कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) (ठोक मानधन रु.25,000/-) यांची मुदत दि.03/11/2022 रोजी मुदत संपुष्टात आल्याने मुदतीचे नविकरण करणेकरीता 06 महिन्यांसाठी एकुण खर्च रु.4,20,000/- (अक्षरी रक्कम रु. चार लाख वीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित असुन सदर प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सदर प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे. परंतु सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लोक प्रतिनिधींची मुदत संपल्याने महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व

(1 ब) मधील तरतुदीनुसार दि.27/08/2022 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका येथे प्रशासक या पदी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना नियुक्त करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने श्री.प्रकाश कुलकर्णी, डेपो मॅनेजर (बस मेंटेनन्स)(ठोक मानधन रु.45,000/-) व श्री.प्रमोद सानप, कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) (ठोक मानधन रु.25,000/-) यांना दि.04/11/2022 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.05/11/2022 व दि.06/11/2022 रोजी शासकीय सुट्टी असल्याने दि.07/11/2022 ते दि.06/05/2023 पर्यंत 06 महिन्याकरीता नियुक्तीचे नविकरण करणेकरीता मा. प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजूरी मिळणेस विनंती आहे.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

टपालद्वारा प्राप्त दि. 01/11/2022 वेळ: 12.30 वा.
प्रशासकीय पत्र
रजिस्टर अ. क्र. 2022/23
01/11/2022
लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सर्वसाधारण सभा

## प्रशासकीय ठराव दि. ०४ / ११ /2022 रोजी दुपारी 3.00 वाजता

ee

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी ठोक मानधनावर डेपो मॅनेजर (बस मेंटेनन्स) व कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) (ठोक मानधन) यांच्या नियुक्तीचे नविकरण करणेबाबत.

## कार्यालयीन प्रस्ताव

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभागासाठी ठोक मानधनावर श्री.प्रकाश कुलकर्णी, डेपो मॅनेजर (बस मेंटेनन्स) व श्री.प्रमोद सानप, कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) (ठोक मानधन) यांना दि.30/05/2022 रोजीच्या आदेशान्वये 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.04/05/2022 ते दि.03/11/2022 पर्यंत नियुक्तीचे नविकरण करण्यात आले आहे.

परिवहन विभागाने श्री.प्रकाश कुलकर्णी, डेपो मॅनेजर (बस मेंटेनन्स) व श्री.प्रमोद सानप, कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) (ठोक मानधन) यांची दि.03/11/2022 रोजी मुदत संपुष्टात येत असल्याने दि.04/10/2022 रोजीच्या पत्रान्वये मुदतवाढीबाबत कार्यवाही करणेकरीता कळविले आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने श्री.प्रकाश कुलकर्णी, डेपो मॅनेजर (बस मेंटेनन्स) व श्री.प्रमोद सानप, कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) (ठोक मानधन) यांची नियुक्ती दि.03/11/2022 रोजीपर्यंत संपुष्टात येत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53(3) अन्वये नगरपालिका अधिकारी/कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहित असेल तसेच आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजूरीवाचून कोणतीही तात्पुरती नेमणूक 06 महिन्यांहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही, असे नमुद आहे.

परिवहन विभागाची आवश्यकता पाहता श्री.प्रकाश कुलकर्णी, डेपो मॅनेजर (बस मेंटेनन्स)(ठोक मानधन रु.45,000/-) व श्री.प्रमोद सानप, कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) (ठोक मानधन रु.25,000/-) यांची मुदत दि.03/11/2022 रोजी मुदत संपुष्टात आल्याने मुदतीचे नविकरण करणेकरीता 06 महिन्यांसाठी एकुण खर्च रु.4,20,000/- (अक्षरी रक्कम रु. चार लाख वीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित असुन सदर प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सदर प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे. परंतु सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लोक प्रतिनिधींची मुदत संपल्याने महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022

नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार दि.27/08/2022 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका येथे प्रशासक या पदी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना नियुक्त करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने श्री.प्रकाश कुलकर्णी, डेपो मॅनेजर (बस मेंटेनन्स)(ठोक मानधन रु.45,000/-) व श्री.प्रमोद सानप, कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) (ठोक मानधन रु.25,000/-) यांना दि.04/11/2022 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.05/11/2022 व दि.06/11/2022 रोजी शासकीय सुट्टी असल्याने दि.07/11/2022 ते दि.06/05/2023 पर्यंत 06 महिन्याकरीता नियुक्तीचे नविकरण करणेकरीता मा. प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजूरी मिळणेस विनंती आहे, असा कार्यालयीन प्रस्ताव शासनामार्फत सादर करण्यात आलेला आहे.

## सर्वसाधारण सभा प्रशासकीय ठराव क्र. ६५ दिनांक ०४/११/2022

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी ठोक मानधनावर डेपो मॅनेजर (बस मेंटेनन्स) व कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) (ठोक मानधन) यांच्या नियुक्तीचे नविकरण करण्याबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क.71(भाग-2)/नवि-14, दि.27/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. सर्वसाधारण सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "श्री.प्रकाश कुलकर्णी, डेपो मॅनेजर (बस मेंटेनन्स) (ठोक मानधन रु.45,000/-) व श्री.प्रमोद सानप, कनिष्ठ अभियंता (मॅकॅनिकल) (ठोक मानधन रु.25,000/-) यांना दि.04/11/2022 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.05/11/2022 व दि.06/11/2022 रोजी शासकीय सुट्टी असल्याने दि.07/11/2022 ते दि.06/05/2023 पर्यंत 06 महिन्याकरीता नियुक्तीचे नविकरण करणेकरीता मंजूरी देण्यात येत आहे."

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- आस्थापना विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीकरीता सादर.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग**

~~मा. महा~~सभा दि. ०४/१२/२०२२

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.:- ८७ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. १ ते ६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने, चौपाट्या व दुभाजकांना भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्याचा पुरवठा करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. (कालावधी २ वर्ष)**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये ८८ उद्याने, १५ मैदाने व २० दुभाजके विकसीत करण्यात आलेली असुन त्यामध्ये लॉन व शोभिवंत झाडे लावण्यात आलेली आहेत. लॉन व शोभिवंत झाडांकरीता तलावातील पाणी देण्यात येते. त्याकरीता टँकरद्वारे पाण्याचा पुरवठा उद्याने, मैदाने व दुभाजके यांना केला जातो. त्याकामी भाडेतत्वावर प्रती टँकर प्रती फेरा या प्रमाणे दर मंजुर करुन आवश्यकतेनुसार पाण्याचा पुरवठा उद्याने, मैदाने व दुभाजके यांना केला जातो.

त्यानुसार प्रभाग समिती क्र. १ ते ६ करीता खालील तक्त्यात नमुद प्रमाणे नमुद प्रमाणे उद्याने, मैदाने व दुभाजक यांना प्रती दिन प्रमाणे भाडेतत्वावर टँकरची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्रमांक | फेरे प्रती दिन |
|---|---|---|
| १ | प्रभाग समिती क्र. १, २ व ३ | ३६ फेरे अंदाजित |
| २ | प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६ | ५९ फेरे अंदाजित |
| | **एकुण फेरे** | **९५ फेरे** |

तसेच सद्यस्थितीत पावसाचे दिवस संपल्याने उद्याने, मैदाने, दुभाजके यांना भाडेतत्वावर टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता आहे. परंतु मागील मंजुर ठेकेदार मे. कनिष्क वॉटर सप्लाय यांच्या वार्षिक कार्यादेशाची मुदत दि.०३/१०/२०२२ पर्यंत असल्याने मा. आयुक्त सो यांच्या दि.२७/१०/२०२२ रोजीच्या मान्यतेने नव्याने निविदा मागवुन निविदा मंजुरी कार्यवाहीस दिड ते दोन महिन्याचा कालावधी लागणार असल्याने तो पर्यंत ठेकेदार मे. कनिष्क वॉटर सप्लायर्स यांना मागील मंजुर दराने निविदा मंजुर होई पर्यंत मुदतवाढ देवुन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात वृक्ष प्राधिकरण अर्थ संकल्पात "टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे" या लेखा शिर्षकाअंतर्गत रु.५०.०० लाख व उद्यान विभाग "टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे/ नविन टँकर खरेदी करणे" या लेखाशिर्षका अंतर्गत रु. १००.०० लाख अशी एकुण रु.१५०.०० लाख तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदी मधुन खर्च करण्यात येणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. १ ते ६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने, चौपाट्या व दुभाजकांना २ वर्ष कालावधीकरीता भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्याचा पुरवठा करणेकामी रु. २००.०० लाख खर्च अपेक्षित आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. १ ते ६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने, चौपाट्या व दुभाजकांना ०२ वर्ष कालावधीकरीता भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्याचा पुरवठा करणेकामी ई-टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने निविदा मागविण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस असे.

(संजय शिंदे)
उप. आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग

प्रशासकीय ठराव दि.०४/११/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता.

**प्रकरण क्र. ९७ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. १ ते ६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने, चौपाट्या व दुभाजकांना भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्याचा पुरवठा करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. (कालावधी २ वर्ष)**

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये ८८ उद्याने, १५ मैदाने व २० दुभाजके विकसीत करण्यात आलेली असुन त्यामध्ये लॉन व शोभिवंत झाडे लावण्यात आलेली आहेत. लॉन व शोभिवंत झाडांकरीता तलावातील पाणी देण्यात येते. त्याकरीता टँकरद्वारे पाण्याचा पुरवठा उद्याने, मैदाने व दुभाजके यांना केला जातो. त्याकामी भाडेतत्वावर प्रती टँकर प्रती फेरा या प्रमाणे दर मंजुर करुन आवश्यकतेनुसार पाण्याचा पुरवठा उद्याने, मैदाने व दुभाजके यांना केला जातो.

त्यानुसार प्रभाग समिती क्र. १ ते ६ करीता खालील तक्त्यात नमुद प्रमाणे नमुद प्रमाणे उद्याने, मैदाने व दुभाजक यांना प्रती दिन प्रमाणे भाडेतत्वावर टँकरची आवश्यकता आहे. सदर बाबत मा. आयुक्त सो. यांची मंजुरी घेण्यात आलेली आहे.

तसेच सद्यस्थितीत पावसाचे दिवस संपल्याने उद्याने, मैदाने, दुभाजके यांना भाडेतत्वावर टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता आहे. परंतु मागील मंजुर ठेकेदार मे. कनिष्क वॉटर सप्लाय यांच्या वार्षिक कार्यादेशाची मुदत दि.०३/१०/२०२२ पर्यंत असल्याने मा. आयुक्त सो यांच्या दि.२७/१०/२०२२ रोजीच्या मान्यतेने नव्याने निविदा मागवुन निविदा मंजुरी कार्यवाहीस दिड ते दोन महिन्याचा कालावधी लागणार असल्याने तो पर्यंत ठेकेदार मे. कनिष्क वॉटर सप्लायर्स यांना मागील मंजुर दराने निविदा मंजुर होई पर्यंत मुदतवाढ देवुन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कार्यादेशाचे अवलोकन करण्यात येत आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात वृक्ष प्राधिकरण अर्थ संकल्पात "टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे" या लेखा शिर्षकाअंतर्गत रु.५०.०० लाख व उद्यान विभाग "टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे/ नविन टँकर खरेदी करणे" या लेखाशिर्षका अंतर्गत रु. १००.०० लाख अशी एकुण रु.१५०.०० लाख तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदी मधुन खर्च करण्यात येणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. १ ते ६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने, चौपाट्या व दुभाजकांना २ वर्ष कालावधीकरीता भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्याचा पुरवठा करणेकामी रु. २००.०० लाख खर्च अपेक्षित आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. १ ते ६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने, चौपाट्या व दुभाजकांना ०२ वर्ष कालावधीकरीता भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्याचा पुरवठा करणेकामी ई-टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने निविदा मागविण्यास प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ९८ दि. ०४ / ११ /२०२२**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. १ ते ६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने, चौपाट्या व दुभाजकांना भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्याचा पुरवठा करणे (कालावधी २ वर्ष) कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. १ ते ६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने, चौपाट्या व दुभाजकांना भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्याचा पुरवठा करणेकामी (कालावधी २ वर्ष) ई-टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने निविदा मागविण्यास प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // बांधकाम विभाग //

## // गोषवारा //

सभा दि. ०४/११/2022

**प्रकरण क्रमांक.** ( ९८ ) - मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेतील सॉल्ट विभागाच्या जागेवरील विकास योजना रस्त्याच्या जागा ताब्यात घेणेसाठी जागेचा मोबदला सॉल्ट विभागास देणे बाबत

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशन जवळ वाहतुकीची प्रचंड कोंडी होत असल्याने सदर भागात असलेले विकास योजना रस्त्याच्या जागा ताब्यात घेऊन सदर रस्ते विकसित करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. सदर विकास योजना रस्त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | रस्त्याचे ठिकाण | रस्त्याची रुंदी | सर्व्हे क्र. | बाधित क्षेत्र | जागेचे मुल्यांकन |
|---|---|---|---|---|---|
| 1. | भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन समोरील 30 मीटर रुंद रस्ता | 30 मीटर | मौजे भाईंदर सर्व्हे क्र.753 (340) | 4418.69 चौ.मीटर | रु.7,05,51,948/- |
| 2. | भाईंदर (प.) रेल्वे समांतर 10 मीटर रुंद रस्ता | 10 मीटर | मौजे भाईंदर सर्व्हे क्र.725 सीटीएस क्र.1506,1512 | 472.04 चौ.मीटर | रु.1,08,56,920/- |
| 3. | भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन समोरील 18 मीटर रुंद रस्ता | 18 मीटर | मौजे भाईंदर सर्व्हे क्र.725 अ (349/13) सीटीएस क्र.1506,1503,1484 | 1044.66 चौ.मीटर | रु.2,15,21,744/- |

वरील रस्त्याच्या जागा हया केंद्र शासनाच्या अख्यरीती मधील सॉल्ट विभागाच्या असुन केंद्र शासनाच्या धोरणानुसार सदर जागा हस्तांतरीत करण्यासाठी बंधपत्रासह राज्य शासनामार्फत सॉल्ट विभागाकडे जागा मागणीचा प्रस्ताव पाठविणे बंधनकारक आहे. वरील तीन रस्त्याच्या जागेचे चालु बाजार भावानुसार मुल्यांकन रु.10,29,30,612/- एवढे होत असुन सदर रक्कम भरणेबाबत केंद्र शासनाच्या धोरणानुसार विहीत नमुन्यात बंधपत्र देणे आवश्यक आहे. सोबत बंधपत्र जोडले असुन सदर बंधपत्र देणेस व राज्य शासनाकडे जागा हस्तांतरणासाठी प्रस्ताव पाठविणेस प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
प्र.शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

PC-6/2022-23/DK/MG-13

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक ०४ नोव्हेंबर 2022 रोजी वाजता.

**विषय क्र. ( ९८) :-** मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेतील सॉल्ट विभागाच्या जागेवरील विकास योजना रस्त्याच्या जागा ताब्यात घेणेसाठी जागेचा मोबदला सॉल्ट विभागास देणे बाबत

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशन जवळ वाहतुकीची प्रचंड कोंडी होत असल्याने सदर भागात असलेले विकास योजना रस्त्याच्या जागा ताब्यात घेऊन सदर रस्ते विकसित करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. सदर विकास योजना रस्त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे

| अ.क्र. | रस्त्याचे ठिकाण | रस्त्याची रुंदी | सर्व्हे क्र. | बाधित क्षेत्र | जागेचे मुल्यांकन |
|---|---|---|---|---|---|
| 1. | भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन समोरील 30 मीटर रुंद रस्ता | 30 मीटर | मौजे भाईंदर सर्व्हे क्र.753 (340) | 4418.69 चौ.मीटर | रु.7,05,51,948/- |
| 2. | भाईंदर (प.) रेल्वे समांतर 10 मीटर रूंद रस्ता | 10 मीटर | मौजे भाईंदर सर्व्हे क्र.725 सीटीएस क्र.1506,1512 | 472.04 चौ.मीटर | रु.1,08,56,920/- |
| 3. | भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन समोरील 18 मीटर रूंद रस्ता | 18 मीटर | मौजे भाईंदर सर्व्हे क्र.725 अ (349/13) सीटीएस क्र.1506,1503,1484 | 1044.66 चौ.मीटर | रु.2,15,21,744/- |

वरील रस्त्याच्या जागा हया केंद्र शासनाच्या अख्यरीती मधील सॉल्ट विभागाच्या असुन केंद्र शासनाच्या धोरणानुसार सदर जागा हस्तांतरीत करण्यासाठी बंधपत्रासह राज्य शासनामार्फत सॉल्ट विभागाकडे जागा मागणीचा प्रस्ताव पाठविणे बंधनकारक आहे. वरील तीन रस्त्याच्या जागेचे चालु बाजार भावानुसार मुल्यांकन रु.10,29,30,612/- एवढे होत असुन सदर रक्कम भरणेबाबत केंद्र शासनाच्या धोरणानुसार विहीत नमुन्यात बंधपत्र देणे आवश्यक आहे. सोबत बंधपत्र जोडले असुन सदर बंधपत्र देणेस व राज्य शासनाकडे जागा हस्तांतरणासाठी प्रस्ताव पाठविणेस प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

## प्रशासकीय ठराव क्र. ९७ दिनांक ०४/ ११ /2022

मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेतील सॉल्ट विभागाच्या जागेवरील विकास योजना रस्त्याच्या जागा ताब्यात घेणेसाठी जागेचा मोबदला सॉल्ट विभागास देणे कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन खालील रस्त्याच्या जागा हया केंद्र शासनाच्या अखत्यारी मधील सॉल्ट विभागाच्या असुन केंद्र शासनाच्या धोरणानुसार सदर जागा हस्तांतरीत करण्यासाठी बंधपत्रासह राज्य शासनामार्फत सॉल्ट विभागाकडे जागा मागणीचा प्रस्ताव पाठविणे बंधनकारक आहे. वरील तीन रस्त्याच्या जागेचे चालु बाजार भावानुसार मुल्यांकन रु.10,29,30,612/- एवढे होत असुन सदर रक्कम भरणेबाबत केंद्र शासनाच्या धोरणानुसार विहीत नमुन्यात बंधपत्र देणे आवश्यक आहे. सोबत बंधपत्र जोडले असुन सदर बंधपत्र देणेस व राज्य शासनाकडे जागा हस्तांतरणासाठी प्रस्ताव पाठविणेस व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | रस्त्याचे ठिकाण | रस्त्याची रुंदी | सर्व्हे क्र. | बाधित क्षेत्र | जागेचे मुल्यांकन |
|---|---|---|---|---|---|
| 1. | भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन समोरील 30 मीटर रुंद रस्ता | 30 मीटर | मौजे भाईंदर सर्व्हे क्र.753 (340) | 4418.69 चौ.मीटर | रु.7,05,51,948/- |
| 2. | भाईंदर (प.) रेल्वे समांतर 10 मीटर रूंद रस्ता | 10 मीटर | मौजे भाईंदर सर्व्हे क्र.725 सीटीएस क्र.1506,1512 | 472.04 चौ.मीटर | रु.1,08,56,920/- |
| 3. | भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन समोरील 18 मीटर रूंद रस्ता | 18 मीटर | मौजे भाईंदर सर्व्हे क्र.725 अ (349/13) सीटीएस क्र.1506,1503,1484 | 1044.66 चौ.मीटर | रु.2,15,21,744/- |

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प) ता.जि.ठाणे

// समाज विकास विभाग (DAY-NULM) //

सभा ~~प्रशासकिय ठराव~~ दिनांक ०४/ ११ /2022 रोजी वाजता

## गोषवारा

**विषय क्रमांक- ९९ :- शहरी नागरी बेघर निवारा या घटकाअंतर्गत भाडे तत्तवावर निवा-याचा प्रशासकिय ठरावासह डिपीआर (DPR) मा.नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्याकडे मंजूर मिळण्यासाठी सादर करणेबाबत..**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्रेंद्रशासन पुरस्कृत "दीनदयाळ अंत्योदय योजना- नागरी उपजिविका अभियान" अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरी बेघरांना निवारा घटकाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लोकसंख्येच्या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात किमान 8 बेघर निवारे असणे आवश्यक आहे.

सदयस्थितीत आरक्षण क्रं.318, काशिंगाव, विनय नगर, काशिमिरा येथे 77 पलंग क्षमता असलेला एक कायमस्वरुपी बेघर निवारा आहे. परंतु उर्वरित 7 बेघर निवाऱ्यांची आवश्यकता असुन सदर विषयाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार करुन पाठपुरावा करण्यात आला आहे. परंतु नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी यांचे कार्यालयाकडील सुचनांनुसार 7/12 महानगरपालिकेच्या नावावर असलेली जागा उपलब्ध् झाली नसल्यामुळे नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी यांचेकडुन याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले होते. महानगरपालिकेची जागा अथवा जुनी इमारत उपलब्ध नसल्याचे संबंधित विभागाने प्रमाणित करावे. नागरी बेघरांना निवारा घटकाच्या मार्गदर्शक सुचनेमधील मुद्दा क्र.6.5 नुसार भाडे तत्वावर निवारा सुरु करण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी. शहरातील ज्या भागामध्ये बेघरांची घनता अधिक आहे अशा ठिकाणावरील इमारतीचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे प्रमाणित करावे व त्यानुसार भाडे तत्वावर इमारतीसाठी स्वारस्याची अभिव्यक्ती (Eol) प्रसिध्द करावी. अशाप्रकारे निवड करण्यात आलेल्या भाडे तत्वावरील इमारतीमध्ये निवा-याचे देखभाल व व्यवस्थापन हे महानगरपालिका स्वत: अथवा निवारा व्यवस्थापन संस्थेची विहित पध्दतीने निवड करुन करता येईल. निवारा कार्यरत झाल्यानंतर निवारा देखभाल व व्यवस्थापन प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य प्रकल्प मान्यता समितीकडे सादर करण्यात यावा असे कळविलेले आहे.

मिरारोड (पू) माशाचापाडा काशिमिरा येथील मे.पराश ज्ञान प्रसारक मंडळ यांचे जागेचे मुल्यांक अहवालानुसार खालील तक्त्यात नमुदप्रमाणे भाडेदर निश्चित करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | जमिन मालकाचे नाव | जागेचे क्षेत्र | बेघरांची क्षमता | मासिक भाडे | वार्षिक भाडे |
|---|---|---|---|---|---|
| 1. | मे.पराश ज्ञान प्रसारक मंडळ | तळ मजला 431.89चौ.मी | 40 | रु.44,969/- | रु,5,39623/- |
| | | पहिला मजला 319.52 चौ.मी | 60 | | |
| | | एकूण | 100 | रु.44,969/- | रु,5,39,623/- |

वरील तक्त्यात नमूद केलेल्या मे.पराश ज्ञान प्रसारक मंडळ यांनी एकूण 5 गुंठे जागेवरील अंदाजित 40 पलंग क्षमता असलेले तळ मजला व 60 पलंग क्षमता असलेले पहिला मजला असे

एकूण 100 बेघर व्यक्तींची व्यवस्था होईल. अशा जागेसाठी मासिक दर रक्कम रु.44,969/- आणि वार्षिक रक्कम रु.5,39,623/- रुपये भाडेतत्वावर जागा देणेबाबत सहमती दर्शविली आहे. सदर जागेत बांधकामासाठी रक्कम रु.49,93,511/- रुपयांची दि.13/10/2022 अन्वये निवारा केंद्र नुतनीकरण करण्यासाठी शहर अभियंता यांच्याकडून तांत्रीक मंजूरी प्राप्त झालेली आहे.

तरी संबंधीत जागेबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल त्याचप्रमाणे जागेचे कब्जापत्र, साठेकरारनामा व कधीही रद्द न होणारे कुलमुखत्यारनामा आणि **प्रशासकिय ठरावासह** व मा.नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्याकडे मंजूरीकरिता सादर करणेकामी प्रशासकिय ठरावास मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

Dy/11/m

(रवि पवार)
उप-आयुक्त
तथा
शहर प्रकल्प अधिकारी
(DAY-NULM)
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि 02/11/2022
प्रशासकीय पत्र गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. 908 वर्ष 2022/23

वेळ
5-10 वा.

02/11/2022
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## समाजविकास विभाग (DAY-NULM)

## प्रशासकीय ठराव दिनांक ०४ नोव्हेंबर 2022 रोजी

**विषय क्र.-( ९९) मा.आयुक्त महोदयाकडील कामकाज**
**शहरी नागरी बेघर निवारा या घटकाअंतर्गत भाडे तत्तवावर निवा-याचा प्रशासकिय ठरावासह डिपीआर (DPR) मा.नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्याकडे मंजूर मिळण्यासाठी सादर करणेबाबत..**

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्रेंद्रशासन पुरस्कृत "दीनदयाळ अंत्योदय योजना- नागरी उपजिविका अभियान" अंतर्गत् मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरी बेघरांना निवारा घटकाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लोकसंख्येच्या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात किमान 8 बेघर निवारे असणे आवश्यक आहे.

सदयस्थितीत आरक्षण क्रं.318, काशिंगाव, विनय नगर, काशिमिरा येथे 77 पलंग क्षमता असलेला एक कायमस्वरुपी बेघर निवारा आहे. परंतु उर्वरित 7 बेघर निवाऱ्यांची आवश्यकता असुन सदर विषयाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार करुन पाठपुरावा करण्यात आला आहे. परंतु नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी यांचे कार्यालयाकडील सुचनांनुसार 7/12 महानगरपालिकेच्या नावावर असलेली जागा उपलब्ध् झाली नसल्यामुळे नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी यांचेकडुन याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले होते. महानगरपालिकेची जागा अथवा जुनी इमारत उपलब्ध नसल्याचे संबंधित विभागाने प्रमाणित करावे. नागरी बेघरांना निवारा घटकाच्या मार्गदर्शक सुचनेमधील मुद्दा क्र.6.5 नुसार भाडे तत्वावर निवारा सुरु करण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी. शहरातील ज्या भागामध्ये बेघरांची घनता अधिक आहे अशा ठिकाणावरील इमारतीचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे प्रमाणित करावे व त्यानुसार भाडे तत्वावर इमारतीसाठी स्वारस्याची अभिव्यक्ती (EoI) प्रसिध्द करावी. अशाप्रकारे निवड करण्यात आलेल्या भाडे तत्वावरील इमारतीमध्ये निवा-याचे देखभाल व व्यवस्थापन हे महानगरपालिका स्वत: अथवा निवारा व्यवस्थापन संस्थेची विहित पध्दतीने निवड करुन करता येईल. निवारा कार्यरत झाल्यानंतर निवारा देखभाल व व्यवस्थापन प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य प्रकल्प मान्यता समितीकडे सादर करण्यात यावा असे कळविलेले आहे.मिरारोड (पू) माशाचापाडा काशिमिरा येथील मे.पराश ज्ञान प्रसारक मंडळ यांचे जागेचे मुल्यांक अहवालानुसार खालील तक्त्यात नमुदप्रमाणे भाडेदर निश्चित करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | जमिन मालकाचे नाव | जागेचे क्षेत्र | बेघरांची क्षमता | मासिक भाडे | वार्षिक भाडे |
|---|---|---|---|---|---|
| 1. | मे.पराश ज्ञान प्रसारक मंडळ | तळ मजला 431.89चौ.मी | 40 | रु.44,969/- | रु,5,39623/- |
| | | पहिला मजला 319.52 चौ.मी | 60 | | |
| | | एकूण | 100 | रु.44,969/- | रु,5,39,623/- |

वरील तक्त्यात नमूद केलेल्या मे.पराश ज्ञान प्रसारक मंडळ यांनी एकूण 5 गुंठे जागेवरील अंदाजित 40 पलंग क्षमता असलेले तळ मजला व 60 पलंग क्षमता असलेले पहिला मजला असे

एकूण 100 बेघर व्यक्तींची व्यवस्था होईल. अशा जागेसाठी मासिक दर रक्कम रु.44,969/- आणि वार्षिक रक्कम रु.5,39,623/- रुपये भाडेतत्वावर जागा देणेबाबत सहमती दर्शविली आहे.

सदर जागेत बांधकामासाठी रक्कम रु.49,93,511/- रुपयांची दि.13/10/2022 अन्वये निवारा केंद्र नुतनीकरण करण्यासाठी शहर अभियंता यांच्याकडून तांत्रीक मंजूरी प्राप्त झालेली आहे.

तरी संबंधीत जागेबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल त्याचप्रमाणे जागेचे कब्जापत्र, साठेकरारनामा व कधीही रद्द न होणारे कुलमुखत्यारनामा आणि **प्रशासकिय ठरावासह** व मा.नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्याकडे मंजूरीकरिता सादर करणेकामी प्रशासकिय ठरावाद्वारे मान्यता देण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

**प्रशासकिय ठराव क्र. ९८ दिनांक ०४/ ११ /2022**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे.पराश ज्ञान प्रसारक मंडळ यांनी एकूण 5 गुंठे जागेवरील अंदाजित 40 पलंग क्षमता असलेले तळ मजला व 60 पलंग क्षमता असलेले पहिला मजला असे एकूण 100 बेघर व्यक्तींची व्यवस्था होईल अशाप्रकारची निवारा केंद्रासाठी भाडेतत्वावर जागा देण्यासंबंधी प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदीचे विशेषत: कलम 452(अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या आधिकाराचा वापर करुन् प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे.पराश ज्ञान प्रसारक मंडळ यांनी एकूण 5 गुंठे जागेवरील अंदाजित 40 पलंग क्षमता असलेले तळ मजला व 60 पलंग क्षमता असलेले पहिला मजला असे एकूण 100 बेघर व्यक्तींची व्यवस्था होईल. अशा जागेसाठी मासिक दर रक्कम रु. 44,969/- आणि वार्षिक रक्कम रु.5,39,623/- रुपये भाडेतत्वावर जागा देणेबाबत सहमती दर्शविली आहे.

सदर जागेत बांधकामासाठी रक्कम रु.49,93,511/- अंदाजपत्रकिय खर्चास मान्यता देण्यात येत आहे. दि.13/10/2022 अन्वये निवारा केंद्र नुतनीकरण करण्यासाठी शहर अभियंता यांच्याकडून तांत्रीक मंजूरी प्राप्त झालेला डीपीआर व प्रस्तावात नमूद केलेल्या बाबीस मा.नगरपरिषद प्रशा[illegible] संचालनालय यांच्याकडे सादर करण्यासाठी प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत:- समाजविकास विभागाकडे (DAY-NULM) योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सार्व. आरोग्य विभाग

**// प्रशासकीय गोषवारा //**

सभा दि. ०४/१२/2022

**प्रकरण :-** ९०० **महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास योजनेतंर्गत ओवळा-माजिवडा मतदार संघातील मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कचरा गोळा करण्यासाठी छोट्या घंटागाड्या खरेदी करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधा विकास योजनेतंर्गत विविध विकास कामांना शासन निर्णय क्र.मनपा-2022/प्रक्र.174(19/1)/नंवि-6, दि. 22 जुलै, 2022 नुसार निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर शासन निर्णय विवरणपत्रातील त्यापैकी अ.क्र. 11 मध्ये ओवळा-माजिवडा मतदार संघातील मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कचरा गोळा करण्यासाठी छोट्या घंटागाड्या खरेदीसाठी रु. 1.00 कोटी निधी मंजुर केला आहे. सदर शासन निर्णयानुसार 100% निधी शासनाकडून मिळणार आहे. महापालिकेचा हिस्सा त्यात टाकण्याची आवश्यकता नाही.

शासन निर्णयानुसार "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधा विकास योजनेतंर्गत विविध विकास" या योजनेअंतर्गत अ.क्र. 11 ओवळा-माजिवडा मतदार संघातील मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कचरा गोळा करण्यासाठी छोट्या घंटागाड्या खरेदी कामची ई-टेंडरींद्वारे निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रु. 1.00 कोटी खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

**(रवि पवार)**
**उपायुक्त (आरोग्य)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## सार्व. आरोग्य विभाग
## प्रशासकीय ठराव दिनांक ०४/११ /2022

प्रकरण :-१०० महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास योजनेतंर्गत ओवळा-माजिवडा मतदार संघातील मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कचरा गोळा करण्यासाठी छोट्या घंटागाड्या खरेदी करणेबाबत.

ठराव क्र. :- ९९

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधा विकास योजनेतंर्गत विविध विकास कामांना शासन निर्णय क्र.मनपा-2022/प्रक्र.174(19/1)/नवि-6, दि. 22 जुलै, 2022 नुसार निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर शासन निर्णय विवरणपत्रातील त्यापैकी अ.क्र. 11 मध्ये ओवळा-माजिवडा मतदार संघातील मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कचरा गोळा करण्यासाठी छोट्या घंटागाड्या खरेदीसाठी रु. 1.00 कोटी निधी मंजुर केला आहे. सदर शासन निर्णयानुसार 100% निधी शासनाकडून मिळणार आहे. महापालिकेचा हिस्सा त्यात टाकण्याची आवश्यकता नाही.

शासन निर्णयानुसार "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधा विकास योजनेतंर्गत विविध विकास" या योजनेअंतर्गत अ.क्र. 11 ओवळा-माजिवडा मतदार संघातील मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कचरा गोळा करण्यासाठी छोट्या घंटागाड्या खरेदी कामची ई-टेंडरींद्वारे निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रु. 1.00 कोटी खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# <u>मिरा-भाईंदर महानगरपालिका</u>

## मिळकत विभाग

## // गोषवारा //

सभा दि ०४/११/2022

**प्रकरण क्रमांक (१०१) :-** भाईंदर (पुर्व) जेसलपार्क चौपाटी वरील विधी शेड वापरसाठी सेवा शुल्क आकारणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जेसलपार्क येथील शेड देखभाल दुरूस्ती / संचलना साठी यांना दिली असून सदर संस्थेकडील प्राप्त आगरी समाज उन्नती संस्था (रजि.) पत्र प्राप्त पत्रात त्यांनी मिरा भाईदर महापालिके तर्फे विकासित करण्यांत आलेल्या विधी शेडच्या देखभालीसाठी शुल्क आकारणेचा प्रस्ताव दिला आहे. महापालिकेने बांधलेल्या विधी शेडची मिरा भाईदर मधीलच नव्हे तर दहिसर बोरिवली विभागातील नागरिकही सेवा घेत आहेत व महापालिकेचे कौतुक करत आहेत.

विधी शेड सांभाळतेवेळी त्या ठिकाणी आपली कोणतेही शुल्क आकारणीवर नोंदणी नसल्याने वापरणारे त्याचा गैरवापर करतात. कार्य करणारे पंडीत (भटजी) यांचेही जागेवरुन वादविवाद होत असतात, त्याचबरोबर तिकडच्या सामानाची सुध्दा नासधूस होते.

दशक्रिया विधीसाठी काही लोक शेडमध्ये बसतात तर काही शेडच्या बाहेर बसतात. त्यामुळे साफसफाई ठेवणेही अडचणीचे होते म्हणून विधी शेडमध्ये दशक्रिया करणा-यांना 200/- रु सेवा शुल्क व विधी शेडच्या बाहेर बसणा-यांना 100/- रु सेवाशुल्क आकारण्याची परवानगी द्यावी जेणेकरुन अधिक सोई सुविधा देता येतील व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उभा राहणार नाही. याकरीता लेखी मान्यता द्यावी याबाबत त्यांनी विनंती केलेली आहे.

मे. आगरी समाज उन्नती संस्था यास भाईंदर (पुर्व) जेसलपार्क चौपाटी येथील विधीशेड दैनंदिन संचलन, देखभाल व दुरूस्ती करीता देण्यात आली असून सदर विधीशेड त्यांच्यामार्फत भाईंदर व आजुबाजुच्या परिसरातील रहिवाशांना /नागरीकांना दिवसकार्य विधीसाठी नि:शुल्क देण्यात येत आहे. दशक्रिया विधीसाठी येणारे काही लोक बाहेर व काही लोक गेटच्या आत बसत असून साफसफाई करणे अडचणीचे होत आहे. सदर देखभाल व दुरूस्तीचे काम चांगल्या प्रकारे होण्यासाठी सदर शेडमध्ये दशक्रिया करणाऱ्या कडून रू.200/- व शेडच्या बाहेर बसणाऱ्या लोकांकडून रू.100/- सेवाशुल्क आकारणी करणे योग्य होईल. तरी सदर रक्कम आकारणेसाठी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
प्र. शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

<u>मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.</u>

PC-1/2022-23/DK/SG-2

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक ०४ नोव्हेंबर 2022 रोजी दु. ३.०० वाजता.

---

**विषय क्र.** ( ) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

१०१ भाईंदर (पुर्व) जेसलपार्क चौपाटी वरील विधी शेड वापरसाठी सेवा शुल्क आकारणे बाबत.

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जेसलपार्क येथील शेड देखभाल दुरूस्ती / संचलना साठी यांना दिली असून सदर संस्थेकडील प्राप्त आगरी समाज उन्नती संस्था (रजि.) पत्र प्राप्त पत्रात त्यांनी मिरा भाईदर महापालिके तर्फे विकासित करण्यात आलेल्या विधी शेडच्या देखभालीसाठी शुल्क आकारणेचा प्रस्ताव दिला आहे. महापालिकेने बांधलेल्या विधी शेडची मिरा भाईदर मधीलच नव्हे तर दहिसर बोरिवली विभागातील नागरिकही सेवा घेत आहेत व महापालिकेचे कौतुक करत आहेत.

विधी शेड सांभाळतेवेळी त्या ठिकाणी आपली कोणतेही शुल्क आकारणीवर नोंदणी नसल्याने वापरणारे त्याचा गैरवापर करतात. कार्य करणारे पंडीत (भटजी) यांचेही जागेवरुन वादविवाद होत असतात, त्याचबरोबर तिकडच्या सामानाची सुध्दा नासधूस होते.

दशक्रिया विधीसाठी काही लोक शेडमध्ये बसतात तर काही शेडच्या बाहेर बसतात. त्यामुळे साफसफाई ठेवणेही अडचणीचे होते म्हणून विधी शेडमध्ये दशक्रिया करणा-यांना 200/- रु सेवा शुल्क व विधी शेडच्या बाहेर बसणा-यांना 100/- रु सेवाशुल्क आकारण्याची परवानगी द्यावी जेणेकरुन अधिक सोई सुविधा देता येतील व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उभा राहणार नाही. याकरीता लेखी मान्यता द्यावी याबाबत त्यांनी विनंती केलेली आहे.

मे. आगरी समाज उन्नती संस्था यास भाईंदर (पुर्व) जेसलपार्क चौपाटी येथील विधीशेड दैनंदिन संचलन, देखभाल व दुरूस्ती करीता देण्यात आली असून सदर विधीशेड त्यांच्यामार्फत भाईंदर व आजुबाजुच्या परिसरातील रहिवाशांना /नागरीकांना दिवसकार्य विधीसाठी नि:शुल्क देण्यात येत आहे. दशक्रिया विधीसाठी येणारे काही लोक बाहेर व काही लोक गेटच्या आत बसत असून साफसफाई करणे अडचणीचे होत आहे. सदर देखभाल व दुरूस्तीचे काम चांगल्या प्रकारे होण्यासाठी सदर शेडमध्ये दशक्रिया करणाऱ्या कडून रू.200/- व शेडच्या बाहेर बसणाऱ्या लोकांकडून रू.100/- सेवाशुल्क आकारणी करणे योग्य होईल. तरी सदर रक्कम आकारणेसाठी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

# प्रशासकीय ठराव क्र. ९०० दिनांक ०४/१२/2022

भाईंदर (पुर्व) जेसलपार्क चौपाटी वरील विधी शेड वापरसाठी सेवा शुल्क आकारणे कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पुर्व) जेसलपार्क चौपाटी वरील विधी शेड वापरसाठी सदर शेडमध्ये दशक्रिया करणाऱ्या कडून रू.200/- व शेडच्या बाहेर बसणाऱ्या लोकांकडून रू.100/- सेवा शुल्क आकारणेस मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-1/22-23/DK/SG T- 2

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

## // गोषवारा //

सभा दि: ०४/११/2022

**प्रकरण क्रमांक (१०२)** :- निविदेस मान्यता देणे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| 1 | चेणा गावाकडे जाणारा 18 मीटर विकास योजना रस्ता, रस्त्यालगत गटार, पुल बांधकाम, नदीवरील संरक्षक भिंत आणि जलवाहिनी टाकणेची इत्यादी कामे करणे. | रू.22,83,17,936/- |

| | कंत्राटदाराचे नाव | दर |
|---|---|---|
| | मे. श्रीजी इपीसी प्रा.लि. | रू.30,13,44,226/- (दर वाटाघाटीनंतर) रू.31.98% जास्त दराची (सन 2021-22 च्या राज्य दर सुचीनुसार 8.60% जास्त दराने) |
| | मे. ए. पी. आय सिव्हीलकॉम प्रा. लि. | रू.31,35,86,885/- |

वरीलपैकी मे. श्रीजी इपीसी प्रा. लि. यांची निविदा स्विकारण्यास मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे. सदर कामासाठी शासनाकडून अनुदान प्राप्त होणार असून वाढीव खर्चासाठी शासनाकडे मागणी करण्यात आली आहे. सदर निविदा मान्यतेचा प्रस्ताव यापुर्वी मा. स्थायी समिती सभेपुढे ठेवला असता मा. स्थायी समिती सभा दि.28/02/2022 ठराव क्र. 134 अन्वये सदर निविदा फेर सादर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. मा. स्थायी समिती सभा दि.28/02/2022 ठराव क्र.134 मध्ये नमुद केल्यानुसार सदर रस्त्याच्या कामाकरीता शासनाने फेरबदल मंजूर केला असून इको सेंसेटीव्ह झोनची देखील मान्यता प्राप्त झाली आहे. सदर रस्त्यावरील काही जागा भूसंपादनाद्वारे ताब्यात घेण्यासाठी मा. जिल्हा भुसंपादन अधिकारी, ठाणे यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तरी वरील प्रस्तावित निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) नुसार प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**प्र. शहर अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

<u>मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.</u>

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक ०४ नोव्हेंबर 2022 रोजी दु.३.०० वाजता.

**विषय क्र.** ( ) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

९०२ चेणा गावाकडे जाणारा 18 मीटर विकास योजना रस्ता, रस्त्यालगत गटार, पुल बांधकाम, नदीवरील संरक्षक भिंत आणि जलवाहिनी टाकणेची इत्यादी कामे करणेस मान्यता देणे.

## कार्यालयीन प्रस्तावना

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| 1 | चेणा गावाकडे जाणारा 18 मीटर विकास योजना रस्ता, रस्त्यालगत गटार, पुल बांधकाम, नदीवरील संरक्षक भिंत आणि जलवाहिनी टाकणेची इत्यादी कामे करणे. | रू.22,83,17,936/- |

| | कंत्राटदाराचे नाव | दर |
|---|---|---|
| | मे. श्रीजी इपीसी प्रा.लि. | रू.30,13,44,226/-<br>(दर वाटाघाटीनंतर)<br>रू.31.98% जास्त दराची<br>(सन 2021-22 च्या राज्य दर सुचीनुसार 8.60% जास्त दराने) |
| | मे. ए. पी. आय सिव्हीलकॉम प्रा. लि. | रू.31,35,86,885/- |

वरीलपैकी मे. श्रीजी इपीसी प्रा. लि. यांची निविदा स्विकारण्यास मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे. सदर कामासाठी शासनाकडून अनुदान प्राप्त होणार असून वाढीव खर्चासाठी शासनाकडे मागणी करण्यात आली आहे. सदर निविदा मान्यतेचा प्रस्ताव यापुर्वी मा. स्थायी समिती सभेपुढे ठेवला असता मा. स्थायी समिती सभा दि.28/02/2022 ठराव क्र. 134 अन्वये सदर निविदा फेर सादर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. मा. स्थायी समिती सभा दि.28/02/2022 ठराव क्र.134 मध्ये नमुद केल्यानुसार सदर रस्त्याच्या कामाकरीता शासनाने फेरबदल मंजूर केला असून इको सैंसेटीव्ह झोनची देखील मान्यता प्राप्त झाली आहे. सदर रस्त्यावरील काही जागा भूसंपादनाद्वारे ताब्यात घेण्यासाठी मा. जिल्हा भुसंपादन अधिकारी, ठाणे यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तरी वरील प्रस्तावित निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) नुसार प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देणे आवश्यक आहे.

वरील कामाच्या खर्चास प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

# प्रशासकीय ठराव क्र. ९०९ दिनांक ०४/ ११ /2022

चेणा गावाकडे जाणारा 18 मीटर विकास योजना रस्ता, रस्त्यालगत गटार, पुल बांधकाम, नदीवरील संरक्षक भिंत आणि जलवाहिनी टाकणेची इत्यादी कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन खालील कामांच्या निविदेस खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे. सदयस्थितीत रस्त्याची मनपाकडे हस्तांतरीत झालेल्या व जागा मालकानी रस्ता करण्यासाठी सहमती दिलेल्या जागेतच काम करण्यात यावे. तसेच सदर कामासाठी शासनाकडे पत्रव्यवहार करून निधी उपलब्ध करून घेण्यात यावा.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| 1 | चेणा गावाकडे जाणारा 18 मीटर विकास योजना रस्ता, रस्त्यालगत गटार, पुल बांधकाम, नदीवरील संरक्षक भिंत आणि जलवाहिनी टाकणेची इत्यादी कामे करणे. | रू.22,83,17,936/- |

| | कंत्राटदाराचे नाव | दर |
|---|---|---|
| | मे. श्रीजी इपीसी प्रा.लि. | रू.30,13,44,226/-<br>(दर वाटाघाटीनंतर)<br>रू.31.98% जास्त दराची<br>(सन 2021-22 च्या राज्य दर सुचीनुसार 8.60% जास्त दराने) |
| | मे. ए. पी. आय सिव्हीलकॉम प्रा. लि. | रू.31,35,86,885/- |

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-1/22-23/DK/SG T- 1

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## बीएसयुपी विभाग

### // गोषवारा //

सभा दि. ०४/११/2022

**प्रकरण क्र. (१०३) :-** मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जनता नगर बीएसयुपी प्रकल्पातील इमारत क्र. ५ चे बांधकाम करणे. या कामाच्या निविदेत भावभिन्नता कलमाचा (Price Variation Clause) समावेश करणे व सद्याच्या असाधारण भाववाढीसाठी विशेष मदत (Special Relief) देणेस मान्यता मिळणेबाबत.

**संदर्भ :-** १) कार्यादेश क्र. मनपा/साबां/कार्या/२१८/२०२०-२१ दि. २४/०९/२०२०.

२) मे. शायनो कॉपोरेशन पत्र क्र. SC/MBMC/BSUP-05/2022-23/01 Dt. 10/10/2022..

३) शासन परिपत्रक क्र. Government of Maharashtra, Public Works Department Govt. Circular No. Sankirn-2017/C.R.121/Part II/Bldg.2 Dt.23/10/2017

४) शासन निर्णय -महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. ग्रापाधो-२०१२/प्र.क्र..१२२/ पापु-०७ दि. २९ जून २०२२.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बीएसयुपी प्रकल्पा अंतर्गत प्रगतीपथावर असलेल्या इमारतीपैकी इमारत क्र. ४, ५ व ७ या इमारतीची उर्वरीत कामे शासनाच्या निधी आभावी अपूर्ण होती. सदरची कामे पूर्ण करण्यासाठी महानगरपालिकेने स्वनिधीतून उर्वरीत कामे करण्याकरीता निविदा मागवून इमारत क्र. ५ चे कार्यादेश मे. शायनो कॉपोरेशन यांना दि.२४/०९/२०२० रोजी दिलेले आहेत.

या निविदेमध्ये शासनाच्या परिपत्रकानुसार भावभिन्नता (Price Variation Clause) कलम तसेच साहित्याचे उदा. सिमेंट, स्टील, डांबराचे स्टाररेटचा समावेश करणे आवश्यक होते. परंतु ते लागू करण्यात आलेले नाही. सदरच्या कामाचे कार्यादेश दिल्यानंतर कोविड-१९ तसेच सद्या चालू असलेले रशिया, युक्रेन युध्दाच्या उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे बांधकाम साहित्याच्या दरात असाधारण वाढ झालेली आहे.

यास्तव ठेकेदाराने सदर निविदे अंतर्गत सद्याच्या दरसुची नुसार तसेच भावभिन्नता कलमाची तरतूद करुन त्यानुसार देयके दिल्यासच काम पुढे चालू ठेवता येईल अन्यथा आहे त्या स्थितीमध्ये काम बंद करण्याची नोटीस दिलेली आहे. या अनुषंगाने तसेच शासनाचे परिपत्रक व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे सादर करण्यात येते.

शासनाच्या बांधकाम विभागाचे परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१७/सीआर. १२१ (भाग-२) दि.१९/०९/२०१७. मध्ये स्पष्टीकरण केल्यानुसार निविदेमध्ये सिमेंट, स्टील, डांबर यांचे स्टार रेट नमूद करण्यात यावेत तसेच सदरचे स्टार रेट व ठेकेदाराने प्रत्यक्ष खरेदी केलेल्या साहित्याच्या भाव कमी असल्यास त्याची वसुली करावी व जादाचा असल्यास तो देण्यात यावा. अशी तरतूद आहे. तसेच या व्यतिरिक्त सुधारीत भाववाढ कलमाची तरतूद देखील करावी.

तसेच संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयानुसार बाबनिहाय दरसुचीमध्ये होणाऱ्या बदलांच्या अनुषंगाने पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व नगरविकास विभागातंर्गत अमृत व नगरोत्थान कार्यक्रमाच्या योजनासाठी असलेल्या

निविदांसाठी भावभिन्नता (Price Variation Clause) कलम व विशेष मदत (Special Relief) ची तरतूद केलेली आहे.

यानुसार ज्या योजना दि.०१/११/२०२० रोजी अथवा त्यानंतर प्रगतीपथावर आहेत. त्यांनाच (Special Relief) अनुज्ञेय आहे.

यास्तव नमूद परिपत्रकानुसार ठेकेदारास साहित्याची भाववाढ तसेच सुधारीत भाववाढीचे कलम जरी निविदेमध्ये तरतूद नसली तरी शासन निर्णयानुसार लागू करता येईल असे विभागाचे मत आहे.

तसेच विषयांकीत कामाप्रमाणेच विभागातंर्गत तत्सम प्रकारच्या कामाच्या निविदांना देखील या कलमाची अंमलबजावणी करावी लागेल. सदर ठेकेदाराचे खालील कामे प्रगतीपथावर आहेत.

अ) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जनता नगर बीएसयुपी प्रकल्पातील बीएसयुपी इमारत क्र. ७ चे बांधकाम करणे. (निविदेची किंमत रु. ४४,८१,०७,५७२/-)

ब) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जनता नगर बीएसयुपी प्रकल्पातील बीएसयुपी इमारत क्र. ४ चे बांधकाम करणे (निविदेची किंमत रु. ३५,७५,९८,१७८/-)

क) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. १२२ या जागेत हिंदु हृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे कलादालन उभारणे. (टप्पा-१) (निविदेची किंमत रु. ७,६७,३४,७८७/-)

या कामाच्या निविदांना देखील ठेकेदाराने भावभिन्नता कलमाची मागणी केलेली आहे. यास्तव या कामांना देखील सुधारीत भाववाढ कलम लागू करणे आवश्यक राहील.

नगर विकास विभाग, शासन आदेश क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१(भाग-२) नवि-१४ मा. महानगरपालिका दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व आधिकारी प्राप्त झाले आहेत. तरी वरीलप्रमाणे नमूद कामांना सुधारीत भावभिन्नता (Price Variation Clause) कलम व विशेष मदत (Special Relief) लागू करण्यास तत्वत: मान्यता मिळणेसाठी प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता (बीएसयुपी)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय ठराव दि. ०४ /११ /२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता

**विषय क्र. ( १०३ ) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जनता नगर बीएसयुपी प्रकल्पातील इमारत क्र. ५ चे बांधकाम करणे. या कामाच्या निविदेत भावभिन्नता कलमाचा (Price Variation Clause) समावेश करणे व सद्याच्या असाधारण भाववाढीसाठी विशेष मदत (Special Relief) देणेस मान्यता मिळणेबाबत.

## कार्यलयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बीएसयुपी प्रकल्पा अंतर्गत प्रगतीपथावर असलेल्या इमारतीपैकी इमारत क्र. ४, ५ व ७ या इमारतीची उर्वरीत कामे शासनाच्या निधी आभावी अपूर्ण होती. सदरची कामे पूर्ण करण्यासाठी महानगरपालिकेने स्वनिधीतून उर्वरीत कामे करण्याकरीता निविदा मागवून इमारत क्र. ५ चे कार्यादेश मे. शायनो कॉपोरेशन यांना दि.२४/०९/२०२० रोजी दिलेले आहेत.

या निविदेमध्ये शासनाच्या दि.२३/१०/२०१७ रोजीच्या परिपत्रकानुसार भावभिन्नता (Price Variation Clause) कलम तसेच साहित्याचे उदा. सिमेंट, स्टील, डांबराचे स्टाररेटचा समावेश करणे आवश्यक होते. परंतु त्याचा समावेश करण्यात आलेला नाही. सदरच्या कामाचे कार्यादेश दिल्यानंतर कोविड-१९ तसेच सद्या चालू असलेले रशिया, युक्रेन युध्दाच्या उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे बांधकाम साहित्याच्या दरात असाधारण वाढ झालेली आहे. यास्तव ठेकेदाराने सदर निविदे मध्ये भाववाढ कलमाची अंमलबजावणी करणेबाबत मागणी केलेली आहे.

शासनाच्या बांधकाम विभागाचे परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१७/सीआर. १२१ (भाग-२) दि.१९/०९/२०१७. मध्ये स्पष्टीकरण केल्यानुसार निविदेमध्ये सिमेंट, स्टील, डांबर यांचे स्टार रेट नमूद करण्यात यावेत तसेच सदरचे स्टार रेट व ठेकेदाराने प्रत्यक्ष खरेदी केलेल्या साहित्याच्या भाव कमी असल्यास त्याची वसुली करावी व जादाचा असल्यास तो देण्यात यावा. अशी तरतूद आहे. तसेच या व्यतिरिक्त सुधारीत भाववाढ कलमाची तरतूद करावी असे नमूद आहे.

तसेच महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. ग्रापाधो-२०१२/प्र.क्र..१२२/पापु-०७ दि. २९ जून २०२२. नुसार बाबनिहाय दरसुचीमध्ये होणाऱ्या बदलांच्या अनुषंगाने पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व नगरविकास विभागातंर्गत अमृत व नगरोत्थान कार्यक्रमाच्या योजनासाठी असलेल्या निविदांसाठी भावभिन्नता (Price Variation Clause) कलम व विशेष मदत (Special Relief) ची तरतूद केलेली आहे.

यास्तव नमूद परिपत्रकानुसार ठेकेदारास साहित्याची भाववाढ तसेच सुधारीत भाववाढीच्या कलमाची जरी निविदेमध्ये तरतूद नसली तरी उपरोक्त शासन निर्णय / परिपत्रकानुसार लागू करता येईल.

तसेच विषयांकीत कामाप्रमाणेच विभागातंर्गत तत्सम प्रकारच्या कामाच्या निविदांना देखील या कलमाची अंमलबजावणी करावी लागेल.

नगर विकास विभाग, शासन आदेश क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१(भाग-२) नवि-१४ मा. महानगरपालिका दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व आधिकारी प्राप्त झाले आहेत. तरी वरीलप्रमाणे नमूद कामांना साहित्याची भाववाढ तसेच सुधारीत भावभिन्नता (Price Variation Clause) कलम लागू करण्यास तत्वत: मान्यता मिळणेसाठी प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

# प्रशासकीय ठराव क्र. १०२ दि. ०४ / ११ /२०२२

शासनाच्या बांधकाम विभागाचे परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१७/सीआर. १२१ (भाग-२) दि.१९/०९/२०१७. मध्ये स्पष्टीकरण केल्यानुसार निविदेमध्ये सिमेंट, स्टील, डांबर यांचे स्टार रेट नमूद करण्यात यावेत तसेच सदरचे स्टार रेट व ठेकेदाराने प्रत्यक्ष खरेदी केलेल्या साहित्याच्या भाव कमी असल्यास त्याची वसुली करावी व जादाचा असल्यास तो देण्यात यावा. अशी तरतूद आहे. तसेच या व्यतिरिक्त सुधारीत भाववाढ कलमाची तरतूद करावी असे नमूद आहे.

तसेच दि. २९ जून २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार बाबनिहाय दरसुचीमध्ये होणाऱ्या बदलांच्या अनुषंगाने पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व नगरविकास विभागातंर्गत अमृत व नगरोत्थान कार्यक्रमाच्या योजनासाठी असलेल्या निविदांसाठी भावभिन्नता (Price Variation Clause) कलम व विशेष मदत (Special Relief) ची तरतूद केलेली आहे. यानुसार प्रशासनाने सदरच्या कलमांची अंमलबजावणी बीएसयुपी प्रकल्पातंर्गत इमारत क्र. ४, ५, ७ व हिंदु हृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे कलादालन उभारणे. (टप्पा-१) या कामांच्या निविदांना करण्याबाबतच्या केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र.७१(भाग-२) नवि-१४ दि. २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी श्री. दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार नमूद कामांना सुधारीत भावभिन्नता (Price Variation Clause) कलम व विशेष मदत (Special Relief) लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पध्दतीने करावी.

( दिलीप ढोले )
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- बीएसयुपी विभागाकडे योग्यत्या कार्यवाहीसाठी रवाना.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

## // गोषवारा //

सभा दि. ०४ / ११ /2022

**प्रकरण क्रमांक :- ( १०४ ) निविदांना मान्यता देणे.**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च (जी.एस.टी.वगळून) | निविदाधारकाचे नाव | मंजुरीसाठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| 1. | ठाणे येथील साकेत व कापुरबावडी, भाईंदर (पुर्व) येथील फाटक व मिरा (एम.आय.डी.सी.) येथील पंपिग स्टेशनची वार्षिक देखभाल/ दुरुस्ती करणे. (Tender Id :- 827665_1) (फेर-निविदा सुचना क्र.23) | रु.2,31,00,000/- | **मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि** | **1.00% कमी दर वाटाघाटीअंती 1.00% कमी दर** |
| | | | मे. माना इलेक्ट्रीक ॲन्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस | 10.00% जास्त दर |

वरील निविदांना मा.आयुक्त महोदय यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) अन्वये निविदा दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात उपरोक्त कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (क) नुसार मान्यता देणेस शिफारस आहे.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता (पा.पु.)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रशासकिय ठराव क्र.** १०३ **दिनांक :-** ०४/११/2022

**प्रकरण क्रमांक :- (** १०४ **) निविदांना मान्यता देणे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध निविदांना मान्यता देण्याच्या प्रस्तावांच अवलोकन करण्यात आले

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च (जी.एस.टी.वगळून) | निविदाधारकाचे नाव | मंजुरीसाठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| 1. | ठाणे येथील साकेत व कापुरबावडी, भाईंदर (पुर्व) येथील फाटक व मिरा (एम.आय.डी.सी.) येथील पंपिग स्टेशनची वार्षिक देखभाल/ दुरुस्ती करणे. (Tender Id :- 827665_1) (फेर-निविदा सुचना क्र.23) | रु.2,31,00,000/- | **मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि** | **1.00% कमी दर वाटाघाटीअंती 1.00% कमी दर** |
| | | | मे. माना इलेक्ट्रीक ॲन्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस | 10.00% जास्त दर |

वरील निविदांना मा.आयुक्त महोदय यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) अन्वये निविदा दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांनी प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात उपरोक्त कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (क) नुसार मान्यता देत आहे.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(दिलीप ढोले)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**प्रत :-** पाणी पुरवठा विभाग

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
# पाणी पुरवठा विभाग
## // गोषवारा //

सभा दि. ०४ / १२ /2022

**प्रकरण क्रमांक :- ( १०५ ) निविदांना मान्यता देणे.**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च (जी.एस.टी.वगळून) | निविदाधारकाचे नाव | मंजुरीसाठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध जलकुंभावरील पाईपलाईनवर विविध व्यासाचे इलेक्ट्रोमॅगनेटीक फ्लो मिटर पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे. (Tender Id :- 817818_1) (फेर-निविदा सुचना क्र.18) | रु.43,59,758/- | **मे. एस.एम पॉलिमर्स** | **9.99% कमी दर वाटाघाटीअंती 9.99% कमी दर** |
| | | | मे. इलेकॉन एनर्जी सोल्युशन्स प्रा. | 4.50% कमी दर |
| | | | मे. सुहास इलेक्ट्रीक्ल्स | 1.00% कमी दर |

वरील निविदांना मा.आयुक्त महोदय यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) अन्वये निविदा दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात उपरोक्त कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (क) नुसार मान्यता देणेस शिफारस आहे.

**(शरद नानेगावकर)**
**कार्यकारी अभियंता (पा.पु.)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रशासकिय ठराव क्र.** ९०४ **दिनांक :-** ०४/११/2022

**प्रकरण क्रमांक :- (** ९०५ **) निविदांना मान्यता देणे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध निविदांना मान्यता देण्याच्या प्रस्तावांच अवलोकन करण्यात आले

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च (जी.एस.टी.वगळून) | निविदाधारकाचे नाव | मंजुरीसाठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध जलकुंभावरील पाईपलाईनवर विविध व्यासाचे इलेक्ट्रोमॅगनेटीक फ्लो मिटर पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे.<br>(Tender Id :- 817818_1)<br>(फेर-निविदा सुचना क्र.18) | रु.43,59,758/- | **मे. एस.एम पॉलिमर्स** | **9.99% कमी दर वाटाघाटीअंती 9.99% कमी दर** |
| | | | मे. इलेकॉन एनर्जी सोल्युशन्स प्रा. | 4.50% कमी दर |
| | | | मे. सुहास इलेक्ट्रीकल्स | 1.00% कमी दर |

वरील निविदांना मा.आयुक्त महोदय यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) अन्वये निविदा दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांनी प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात उपरोक्त कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (क) नुसार मान्यता देत आहे.

**(दिलीप ढोले)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत** :- पाणी पुरवठा विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

## ता.जि.ठाणे

## मा. प्रशासकीय सभा दि.०४/११ /2022

## // गोषवारा //

**प्रकरण क्रं.** 90E **:- धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर इमारत वापराबाबत धोरण निश्चित करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका मार्फत रामदेव पार्क , आरक्षण क्रं .230 या जागेत बुध्दविहार व मेडीटेशन सेटर इमारत बांधण्यात आलेली आहे . सदर इमारतीमध्ये एक हॉल , दोन कॉन्फरन्स रुम व एक धम्म विहार , वाहनांसाठी पार्कींग व्यवस्था व कार्यालय अशा विविध सुविधा उपलब्ध आहेत. बांधलेले धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर इमारतीचा वापर सुरु करणेकामी धोरण निश्चित करणेकरीता मा . आयुक्त सो. यांनी सुचना दिलेल्या होत्या . त्याअन्वये धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर हे महानगरपालिके मार्फत चालविण्यांत येणार आहे. तरी धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर चालविणेकरीता खालीलप्रमाणे धोरण निश्चित तयार करण्यात आलेले आहे. या व्यतीरिक्त कार्यक्रम, इतर शुल्क व अटीशर्ती खालीलप्रमाणे,

- **धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मधील हॉल करीता अटीशर्ती खालीलप्रमाणे**

1) सदर धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर हॉल मध्ये मोफत योगा प्रशिक्षणासाठी प्रशिक्षकाची महानगरपालिका मार्फत नेमणुक करुन सकाळी 06.00 ते 09.00 व सायंकाळी 06.00 ते 09.00 या वेळेत राहील.

2) धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मधील हॉल मध्ये बुध्द्विहार प्रार्थनेसाठी प्रशिक्षकांची नेमणुक ही महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल . तसेच सदर बुध्दविहार हे सर्वांसाठी मोफत सकाळी 06.00 ते सायंकाळी 09.00 या वेळेत खुले राहील . तथापि प्रशिक्षणाच्या वेळेत फक्त् बाहेरुन दर्शन राहील.

3) धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर हे सर्व धर्मीयासाठी खुले असुन विविध सार्वजनिक सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी, मुंज, बारसे, साखरपुडा, वाढदिवस, स्नेहसंमेलन, व्यावसायिक सभेकरीता भाडयाने देण्यासाठी खालीलप्रमाणे दर निश्चित करण्यात येत आहेत.,

| अ.क्र. | तपशिल | आकारण्यात येणाऱ्या भाडयाचा तपशिल |
|---|---|---|
| • **सभागृहासाठीचे भाडे दर** | | |
| 1 | सभागृह भाडे | रु.25000/- प्रतिदिन (वातानुकुलित) |
| | | रु.20000/- प्रतिदिन (विनावातानुकुलित) |
| 2 | अनामत रक्कम | रु.25000/- |
| 3 | साफसफाई खर्च | रु.2000/- प्रतिदिन |
| 4 | वीज बिल | प्रति युनिट व्यावसायिक चालु दराप्रमाणे |
| • **कॉन्फरन्स हॉल करीताचे भाडे दर** | | |
| 1 | मोठा कॉन्फरन्स हॉल | रु.10000/- प्रतिदिन (वातानुकुलित) |
| 2 | छोटा कॉन्फरन्स हॉल | रु.8000/- प्रतिदिन (वातानुकुलित) |
| 3 | अनामत रक्कम | रु.10000/- |
| 4 | साफसफाई खर्च | रु.1000/- प्रतिदिन |
| 5 | वीज बिल | प्रति युनिट व्यावसायिक चालु दराप्रमाणे |

D:\Backup 11-09-2017\Desktop\KRIDA VIBHAG\thana ghoshwara\ghoshwara\धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर इमारत वापराबाबत धोरण निश्चित करणेबाबत .doc

| • सभागृह तसेच कॉन्फरन्स् हॉल सहित | | |
|---|---|---|
| 1 | सभागृह हॉल तसेच 2 कॉन्फरन्स रुम | रु.35000/- प्रतिदिन (वातानुकुलित) |
| | | रु.3000व0/- प्रतिदिन (विनावातानुकुलित) |
| 2 | अनामत रक्क्म | रु.35000/- |
| 3 | साफसफाई खर्च | रु.5000/- प्रतिदिन |
| 4 | वीज बिल | प्रति युनिट व्यावसायिक चालु दराप्रमाणे |

4) धम्मसम्राट अशोक कॉन्फरन्स व मेडीटेशन सेंटर मधील सभागृहा मध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणेपुर्वी किमान 15 दिवस अगोदर महानगरपालिकेची लेखी परवानगी घेणे आयोजकास बंधनकारक राहील.

5) धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मधील सभागृहामध्ये स्वयंपाकगृह नसल्यामुळे तसेच जेवणाचा कार्यक्रम अपेक्षित नसल्याने जेवण तयार करता येणार नाही, तथापि बाहेरुन फक्त् बाहेरुन तयार करुन आणलेले जेवण, नाश्ता व पाणी वाटप करता येईल.

6) धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मध्ये मदयपान, धुम्रपान तसेच पान, गुटखा, तंबाखु खाऊन प्रवेश करण्यास मनाई राहील.

7) धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मधील सभागृहामध्ये कार्यक्रमासाठी लागणारे खुर्च्या, स्टेजची, टेबल, फॅन ची व्यवस्था वापर कर्त्याने स्वत: करावयाची आहे. महानगरपालिकेमार्फत खुर्च्या, स्टेज, टेबल, फॅन पुरवठा करण्यात येणार नाही.

8) विनावातानुकुलित सभागृह तसेच कॉन्फरन्स् रुम करीता फॅनची व्यवस्था वापर कर्त्याने स्वत: करावयाची आहे.

9) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रशासकीय व सार्वजनिक कार्यक्रमाकरीता तसेच विविध शासकीय विभागाच्या कार्यक्रमाकरीता सभागृह आवश्यक असल्यास तसेच सदर दिवशी सभागृह तसेच कॉन्फरन्स हॉल रिकामे असल्यास विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येईल.

10)धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मधील दैनंदिन साफसफाई सार्व. आरोग्य विभागाव्दारे करण्यात येईल तसेच सदर बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर इमारत देखभाल व दुरुस्ती, विदयुत देखभाल व दुरुस्ती, प्लबिंग, रंगकाम, फर्निचर, लिकेज व फ्लोरींग दुरुस्ती, खिंडक्यांची दुरुस्ती, ए.सी. देखभाल व दुरुस्ती, शौचालयाची दुरुस्ती इत्यादी कामे ही महानगरपालिका बांधकाम विभागा मार्फत करण्यात येतील.

11)धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मधील व्यवस्थापनाकरीता खालीलप्रमाणे कर्मचारी महानगरपालिकेमार्फत पुरवठा करण्यात येतील.

• **कर्मचारी वर्ग :-**

| अ.क्र. | पद | आवश्यक मनुष्यबळ |
|---|---|---|
| 1 | व्यवस्थापक वरिष्ठ लिपिक | 01 |
| 2 | शिपाई | 01 |
| 3 | सफाई कर्मचारी | 02 **(पाणी व्यवस्था, लाईट व्यवस्था पाहणेकरीता)** |
| 4 | सुरक्षा रक्षक | 03 + (विनंतीनुसार) |

12)धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मध्ये महानगरपालिका मार्फत बुध्दपुर्णिमा, महापरिनिर्वाणदिन, आंबेडकर जयंती साजरी करण्यात येईल व त्यादिवशी समाजातील सर्व संस्थाना/नागरीकांना दर्शनाकरीता उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच

सदर बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर संस्थेस उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. सदर कार्यक्रमाचे नियंत्रण हे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे राहील.

तरी वरीलप्रमाणे धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर चा वापर सुरु करणेकामी बाबतचे धोरण निश्चित करणेकरीता प्रशासकीय ठराव करण्यास मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

**(रवि पवार)**
**उप-आयुक्त**
**क्रीडा विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि.ठाणे

## क्रीडा विभाग

## मा. प्रशासकीय सभा दि. ०४/११ /2022

**प्रकरण क्रं.** १०६ **:- धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर इमारत वापराबाबत धोरण निश्चित करणेबाबत.**

**प्रशासकीय ठराव क्रं.** १०५ **दिनांक :** ०४|११|2022

मिरा भाईंदर महानगरपालिका मार्फत रामदेव पार्क, आरक्षण क्रं.230 या जागेत बुध्दविहार व मेडीटेशन सेटर इमारत बांधण्यात आलेली आहे. सदर इमारतीमध्ये एक हॉल, दोन कॉन्फरन्स रुम व एक धम्म विहार, वाहनांसाठी पार्कीग व्यवस्था व कार्यालय अशा विविध सुविधा उपलब्ध आहेत. बांधलेले धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर इमारतीचा वापर सुरु करणेकामी धोरण निश्चित करणेकरीता मा. आयुक्त सो. यांनी सुचना दिलेल्या होत्या. त्याअन्वये धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर हे महानगरपालिके मार्फत चालविण्यांत येणार आहे. तरी धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर चालविणेकरीता खालीलप्रमाणे धोरण निश्चित तयार करण्यात आलेले आहे. या व्यतीरिक्त कार्यक्रम, इतर शुल्क व अटीशर्ती खालीलप्रमाणे,

- **धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मधील हॉल करीता अटीशर्ती खालीलप्रमाणे**
  1) सदर धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर हॉल मध्ये मोफत योगा प्रशिक्षणासाठी प्रशिक्षकाची महानगरपालिका मार्फत नेमणुक करुन सकाळी 06.00 ते 09.00 व सायंकाळी 06.00 ते 09.00 या वेळेत राहील.
  2) धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मधील हॉल मध्ये बुध्द्विहार प्रार्थनेसाठी प्रशिक्षकांची नेमणुक ही महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल. तसेच सदर बुध्दविहार हे सर्वांसाठी मोफत सकाळी 06.00 ते सायंकाळी 09.00 या वेळेत खुले राहील. तथापि प्रशिक्षणाच्या वेळेत फक्त् बाहेरुन दर्शन राहील.
  3) धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर हे सर्व धर्मीयासाठी खुले असुन विविध सार्वजनिक सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी, मुंज, बारसे, साखरपुडा, वाढदिवस, स्नेहसंमेलन, व्यावसायिक सभेकरीता भाडयाने देण्यासाठी खालीलप्रमाणे दर निश्चित करण्यात येत आहेत.,

| अ.क्र. | तपशिल | आकारण्यात येणाऱ्या भाडयाचा तपशिल |
|---|---|---|
| • **सभागृहासाठीचे भाडे दर** | | |
| 1 | सभागृह भाडे | रु.25000/- प्रतिदिन (वातानुकुलित) |
| | | रु.20000/- प्रतिदिन (विनावातानुकुलित) |
| 2 | अनामत रक्कम | रु.25000/- |
| 3 | साफसफाई खर्च | रु.2000/- प्रतिदिन |
| 4 | वीज बिल | प्रति युनिट व्यावसायिक चालु दराप्रमाणे |
| • **कॉन्फरन्स हॉल करीताचे भाडे दर** | | |
| 1 | मोठा कॉन्फरन्स हॉल | रु.10000/- प्रतिदिन (वातानुकुलित) |
| 2 | छोटा कॉन्फरन्स हॉल | रु.8000/- प्रतिदिन (वातानुकुलित) |

| | | |
|---|---|---|
| 3 | अनामत रक्कम | रु.10000/- |
| 4 | साफसफाई खर्च | रु.1000/- प्रतिदिन |
| 5 | वीज बिल | प्रति युनिट व्यावसायिक चालु दराप्रमाणे |
| • **सभागृह तसेच कॉन्फरन्स् हॉल सहित** | | |
| 1 | सभागृह हॉल तसेच 2 कॉन्फरन्स रुम | रु.35000/- प्रतिदिन (वातानुकुलित) |
| | | रु.3000व0/- प्रतिदिन (विनावातानुकुलित) |
| 2 | अनामत रक्कम | रु.35000/- |
| 3 | साफसफाई खर्च | रु.5000/- प्रतिदिन |
| 4 | वीज बिल | प्रति युनिट व्यावसायिक चालु दराप्रमाणे |

4) धम्मसम्राट अशोक कॉन्फरन्स व मेडीटेशन सेंटर मधील सभागृहा मध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणेपुर्वी किमान 15 दिवस अगोदर महानगरपालिकेची लेखी परवानगी घेणे आयोजकास बंधनकारक राहील.

5) धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मधील सभागृहामध्ये स्वयंपाकगृह नसल्यामुळे तसेच जेवणाचा कार्यक्रम अपेक्षित नसल्याने जेवण तयार करता येणार नाही, तथापि बाहेरुन फक्त् बाहेरुन तयार करुन आणलेले जेवण, नाश्ता व पाणी वाटप करता येईल.

6) धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मध्ये मदयपान, धुम्रपान तसेच पान, गुटखा, तंबाखु खाऊन प्रवेश करण्यास मनाई राहील.

7) धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मधील सभागृहामध्ये कार्यक्रमासाठी लागणारे खुर्च्या, स्टेजची, टेबल, फॅन ची व्यवस्था वापर कर्त्याने स्वत: करावयाची आहे. महानगरपालिकेमार्फत खुर्च्या, स्टेज, टेबल, फॅन पुरवठा करण्यात येणार नाही.

8) विनावातानुकुलित सभागृह तसेच कॉन्फरन्स् रुम करीता फॅनची व्यवस्था वापर कर्त्याने स्वत: करावयाची आहे.

9) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रशासकीय व सार्वजनिक कार्यक्रमाकरीता तसेच विविध शासकीय विभागाच्या कार्यक्रमाकरीता सभागृह आवश्यक असल्यास तसेच सदर दिवशी सभागृह तसेच कॉन्फरन्स हॉल रिकामे असल्यास विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येईल.

10)धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मधील दैनंदिन साफसफाई सार्व. आरोग्य विभागाव्दारे करण्यात येईल तसेच सदर बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर इमारत देखभाल व दुरुस्ती, विदयुत देखभाल व दुरुस्ती, प्लबिंग, रंगकाम, फर्निचर, लिकेज व फ्लोरींग दुरुस्ती, खिंडक्यांची दुरुस्ती, ए.सी. देखभाल व दुरुस्ती, शौचालयाची दुरुस्ती इत्यादी कामे ही महानगरपालिका बांधकाम विभागा मार्फत करण्यात येतील.

11)धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मधील व्यवस्थापनाकरीता खालीलप्रमाणे कर्मचारी महानगरपालिकेमार्फत पुरवठा करण्यात येतील.

- **कर्मचारी वर्ग :-**

| **अ.क्र.** | **पद** | **आवश्यक मनुष्यबळ** |
|---|---|---|
| 1 | व्यवस्थापक वरिष्ठ लिपिक | 01 |
| 2 | शिपाई | 01 |
| 3 | सफाई कर्मचारी | 02 (**पाणी व्यवस्था, लाईट व्यवस्था पाहणेकरीता**) |
| 4 | सुरक्षा रक्षक | 03 + (विनंतीनुसार) |

12)धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर मध्ये महानगरपालिका मार्फत बुध्दपुर्णिमा, महापरिनिर्वाणदिन, आंबेडकर जयंती साजरी करण्यात येईल व त्यादिवशी

समाजातील सर्व संस्थाना/नागरीकांना दर्शनाकरीता उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच सदर बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर संस्थेस उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. सदर कार्यक्रमाचे नियंत्रण हे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे राहील.

तरी वरील अटी शर्तीप्रमाणे धम्मसम्राट अशोक बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर चा वापर सुरु करणेकामी बाबतचे धोरण निश्चित करणेकरीता प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
**प्रशासक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**